स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८२८
स्थन ९१९६

# ...ी.

(... ‘...हॅल्स’ नामक काव्याचें भाषांतर.)

दा. क्र. 1330
काव्य ३५८

लेखक

...नारायण महादेव भिडे, बी. ए.

---

प्रकाशक

सदाशिव गणेश खरे

१७२ शुक्रवार पेठ, पुणें शहर.

---

आवृत्ति पहिली

---

इ. स. १९१६.

---

किंमत चार आणे.

REFBK-0001330
REFBK-0001330

# प्रवासी.

( आंग्लकवि गोल्डस्मिथच्या 'ट्रॅव्हलर' नामक काव्याचें भाषांतर. )

लेखक

नारायण महादेव भिडे, बी. ए.

---

प्रकाशक

सदाशिव गणेश खरे

१७२ शुक्रवार पेठ, पुणें शहर.

---

आवृत्ति पहिली

---

इ. स. १९१६.

---

किंमत चार आणे.

REFBK-0001330

REFBK-0001330

9330

हें पुस्तक पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं छापिलें व **सदाशिव गणेश खरे** यांनीं घ. नं. १७२ शुक्रवार पेठ, पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें.

# अनुक्रमणिका.


| छेद. | पृष्ठ. | पद्यसंख्या. | इं. का. ओळी. |
|---|---|---|---|
| १ सुखाचा शोध .... ... ... | १ | ३८ | ... १- ६२ |
| २ सुखाचा विचार ... ... ... | ५ | २३ | ... ६३-१०४ |
| ३ इतालीची सामाजिक स्थिति ... | ८ | ३३ | ... १०५-१६४ |
| ४ स्वित्झर्लंदची सामाजिक स्थिति .... | १२ | ३९ | .... १६५-२३८ |
| ५ फ्रान्सांतील समाजस्थिति ... | १६ | २३ | ... २३९-२८० |
| ६ हालंदची समाजस्थिति ... ... | १९ | १९ | ... २८१-३१६ |
| ७ इंग्लंदची समाजस्थिति ... ... | २१ | ४३ | ... ३१७-३९२ |
| ८ इंग्लंदची समाजस्थिति (पुढें चालू) | २६ | २७ | ... ३९३-४३८ |
| ९ उपसंहार ... ... ... ... | २९ | ३५ | ... |
| | | एकूण २८० | |



REFBK-0001330

REFBK-0001330

# प्रवासी

## अथवा

## समाज-निरीक्षण-काव्य.

## उपोद्घात.

आज इंग्रेजी भाषेंत जीं कांहीं काव्यें सर्वतोमुखीं आहेत, त्यांतच गोल्ड-स्मिथच्या 'Traveller,' काव्याची गणना होत आहे. हें काव्य कवीनें आपला भाऊ हेन्री यास उद्देशून लिहिलें आहे व त्यासच अर्पण केलें आहे. हें लिहिण्याचा उद्देश त्यानें अर्पणपत्रिकेंत नमूद केला आहे. 'आपल्या देशांतील राज्यपद्धतीमुळें प्रजेला जितकें सुख मिळत आहे, तितकेंच सुख निराळ्या राज्यपद्धतीमुळेंही मिळूं शकतें. प्रत्येक राष्ट्रामध्यें स्वतःस आवडतें असें कांहीं विशिष्ट सुखतत्त्व ठरलेलें असतें; परंतु प्रत्येक राष्ट्रांत या तत्त्वाचा अतिक्रम झालेला पाहण्यांत येतो, हें त्यांत सिद्ध कर-ण्याचा प्रयत्न केला आहे.' काव्याचें विशेष परीक्षण करण्यापूर्वी कवीचा थोडासा वृत्तांत सांगणें बरें.

आलिव्हर गोल्डस्मिथ् याचा जन्म १७२८ च्या नवंबर महिन्याच्या १० व्या तारखेस आयर्लंदमधील पॅलस या खेडेगांवीं झाला. अगोदर घरची गरीबी; त्यामुळें त्याचे लहानपणचे दिवस सुखांत गेले असें नाहीं. त्याचें प्राथमिक शिक्षण एका गांवठी शाळेंत होऊन त्यानें आपल्या वया-च्या १७ व्या वर्षी ट्रिनिटी कॉलेजांत प्रवेश केला. तेथें त्यास निर्वाहा-करितां हलकीं कामें करावीं लागत. तेथील त्याचें शिक्षण कशा प्रकारानें चाललें होतें, यासंबंधींची कांहीं एक माहिती उपलब्ध नाहीं. मात्र एकदां

तो आपल्या पंतोजीबरोबर भांडल्यामुळें त्यानें आलिव्हरास एक जोराचा ठोसा लगावून खालींच पाडलें, ही एवढीच गोष्ट त्याच्यासंबंधानें सांगण्यांत येते. अशा रीतीनें १७४९ सालीं एकदांची त्याची शेवटची परीक्षा पसार होऊन तो पदवीधर बनला. पुढील दोन तीन वर्षें रिकामपणांत घालविल्यावर वैद्यकीचा अभ्यास करण्याकरितां एडिंबरोस गेला. दीड वर्षांतच त्याही अभ्यासाची इतिश्री करून तो हालंदमधील लीडन युनिव्हर्सिटींत व्याख्यानें ऐकावयास गेला. तेथूनही लवकरच निघून त्यानें कांहीं दिवस यूरोपांत प्रवास करण्यांत घालविले. या प्रवासांत त्याच्यावर कोणकोणते प्रसंग गुजरले व तो आपला निर्वाह कसा चालवी, याविषयीं खात्रीलायक अशी माहिती मिळत नाहीं. आतां वेकफील्डचा व्हिकार व प्रवासी यांना जर आत्मचरित्रात्मक म्हणून म्हटलें तर मात्र तो तुतान्या वाजवून व तत्त्वज्ञानावर व्याख्यानें झोडून त्यावर आपली उपजीविका चालवित असे, असें कदाचित म्हणतां येईल. प्रवास संपवून शेवटीं १७५६ मध्यें तो एका ठिकाणची वैद्यकीची एक पदवी पटकावून लंदनास आला. या पुढील काळांतही दुर्दैवानें त्याची कांस सोडली नाहीं. मास्तरकी, नंतर एका मासिकाचा लेखक—अशा रीतीनें त्यानें एका पत्रांत लिहिल्याप्रमाणें—तो 'पोटभरू' चा धंदा करीत होता. तेथूनही मालकाशीं भांडून तो 'बी' नांवाच्या मासिकाचा संपादक झाला. याच संधीला त्या काळच्या विद्वानांमध्यें त्याची ओळख झाली. विशेषतः जानसनची त्याचेवर मर्जी बसली. ज्या मंडळाचे जानसन, बास्वेल, बर्क वगैरेसारखे विद्वान् सभासद होते त्या क्लबांत गोल्डस्मिथचाही प्रवेश झाला. मधून मधून एका साप्ताहिकांत त्याचीं पत्रें एका चिनी गृहस्थाचे सहीनें प्रसिद्ध होऊं लागलीं. हींच हल्लीं 'जगाचा नागरिक' या नांवानें प्रसिद्ध आहेत. हीं पत्रें इंग्लंदांतील त्या काळच्या चालीरीतींवरील टीकात्मक आहेत. शिवाय त्याचा 'वेकफील्डचा व्हिकार' कांदबरी व 'प्रवासी' काव्य लिहिण्याचा उद्योग चाललाच होता. या लेखनव्यवसायावर त्यास पोटापुरतासुद्धां मोबदला मिळत नसे. त्यामुळें कर्ज वाढून तें डोईजड झालें; व त्यास शेवटीं आपल्या मित्रांजवळ पैशा-

करितां तोंड वेंगाडावें लागलें. या नंतर त्यानें 'ओसाड पडलेला गांव' काव्य; 'सुशिक्षित गृहस्थ,' 'विजयजिगीषा,' हीं नाटकें; इंग्लंद, रोम व ग्रीस या देशांचे संक्षिप्त इतिहास वगैरें पुस्तकें लिहिलीं. शेवटल्या नाटाकामुळें त्यास ५०० पौंड मिळाले; परंतु त्याची सांपात्तिक स्थिति शेवटपर्यंत कष्टमय राहिली. शेवटीं संकटांशीं झगडत असतां व लेखनव्यवसाय अव्याहत चालूं असतां त्यानें १७७४ च्या एप्रिल महिन्याचे ४ तारखेस इहलोकास रामराम ठोकला. त्याचा दफनाविधि टेंपल चर्चयार्डमध्यें खाजगी रीतीनेंच साजरा करण्यांत आला. त्याच्या थडग्यावर प्रसिद्ध नट गॅरिक यानें केलेली खालील कविता कोरली आहे.

> बोल शुकासम, गंधर्वासम असे लेखनस्फूर्ति,--
> ज्याची, ऐसा पहुडे येथें गोल्ड्स्मिथ वामनमूर्ति.

इतका कवीचा जीवनवृत्तांत दिल्यानंतर आपण प्रस्तुत काव्याकडे वळूं.

हें 'प्रवासी' काव्य १७६४ च्या डिसेंबरांत प्रकाशित झालें. पहिल्या प्रथम लोकांना हें फारसें आवडलें नाहीं. याबद्दल प्रकाशकांकडून कर्त्यास अवघे २१ पौंड मिळाले. तथापि १७६५ च्या आगष्टपर्यंत त्याच्या एकंदर चार आवृत्त्या निघाल्या. काव्याचा कांहीं भाग स्वित्झर्लंदहून गोल्डस्मिथनें आपला भाऊ हेन्री याजकडे पाठविला होता. त्यावरून कवीचा हें काव्य करण्याचा बेत १७५५ त यूरोपमध्यें प्रवास करीत असतांनाच ठरला होता असें सिद्ध होतें. हें काव्य पूर्ण झाल्यावरही बरेच दिवस तसेंच पडून होतें. यांत कवीनें व जानसननें फेरफार व दुरस्त्या केल्यावर प्रसिद्ध केलें. हें अगदीं वेळेवर बाहेर आलें असें म्हटलें पाहिजे. कारण तो काळ असा होता कीं, त्यांत इंग्रजी कवितेची गति बहुतेक कुंठित झाली होती. सांचलेल्या पाण्याप्रमाणेंच तिची स्थिति झाली होती. तेव्हां याच काव्यानें आंग्ल कवितेची बूज राहिली, व तिची गति इतक्यांतच कुंठित व्हावयाची नाहीं हें दृष्टोत्पत्तीस आणून दिलें. आतां पहिल्या व पुढील प्रवाहाप्रमाणें तिचा संचार या-

वेळीं तितका स्वैर नसेल; परंतु ती मध्यंतरींचा आपला आव अगदींच दवडून बसली असें मात्र कदापि म्हणतां यावयाचें नाहीं. या काव्यांत यूरोपीय समाजांचें निरीक्षण केलें असल्यामुळें यास ' समाज निरीक्षण काव्य ' असेंही दुसरें नांव आहे. यांतील एकंदर झोंक समाजसत्तावादी आहे. कवीची जन्मापासून अखेरपर्यंत दारिद्र्याशींच गांठ पडल्यामुळें व त्याचें बरेंचसें आयुष्य खालच्या वर्गांतील लोकांमध्यें गेल्यामुळें त्याचा परिणाम त्याच्या ग्रंथांवर झाल्याविना राहिला नाहीं. श्रीमंत लोकांच्या अनियंत्रित सत्तेखालीं व वाटेल तशा चाललेल्या त्यांच्या चैनीखालीं हजारों गरीब लोकांचा चूर उडत होता, ही स्थिति प्रत्यहीं प्रत्यक्ष अवलोकन केल्यानें त्याच्या तोंडांतून पहिल्याबद्दल तिटकारा व दुसऱ्याबद्दल उमाळा येऊं लागला. त्याचीं मतें समाजसत्तावादी बनलीं, व हाच समाजसत्तावाद या काव्यामध्यें ठिकठिकाणीं विशेषतः इंग्लंदची स्थिति वर्णित असतांना दृग्गोचर होत आहे. आतां काव्यसौंदर्याविषयीं बोलावयाचें तर कित्येक या कवितासुंदरीच्या बाह्यरूपावर भाळून गेलेले दिसतात, तर कित्येक तिचें ' साधें जीवन व उदात्त विचार ' यामुळें तिच्याकडे कौतुकानें बघत राहिलेले दिसतात. मेकालेसारख्या डोळ्यांत तेल घालून बसणाऱ्या पंडित टीकाकारानें सुद्धां, ' तत्त्वज्ञानानें पूर्ण अशा कोणत्याही प्राचीन व अर्वाचीन काव्यांत या काव्यासारखें सौष्ठव व साधेपणा हे गुण सांपडावयाचे नाहींत. जेथून सभोंवतालचे मोठाले तीन देश दिसतील अशा आल्प्स पर्वतावरील एका टोंकावर बसून एक इंग्रेज प्रवासी खालील अपूर्व सृष्टिसौंदर्य पहात आहे. आपण किती लांबचा प्रवास केला याचा विचार करीत आहे. नानाप्रकारच्या शोभा, हवापाणी, राज्यें, धर्म, स्वभाव वगैरे ज्या ज्या गोष्टी त्यानें पाहिल्या होत्या त्या सर्व मनांत आणीत आहे. याप्रमाणें एकामागून एक वरील विषय घेऊन शेवटीं आपलें सुख राजकीय संस्थेवर नसून आपल्या मनोवृत्तींवरच पुष्कळ अंशीं अवलंबून असतें, अशा प्रकारचें कवीनें—मग तें खरें असो वा खोटें असो—त्यांतून तात्पर्य काढलें आहे,' असा मतितार्थ देऊन नाक मुरडत

वा. क. 9330

कां होईना पण याचा सरसपणा कबूल केला आहे. मग जानसनसारख्या प्रेमळ मित्रानें या काव्याचे गोडवे गावेत यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. मेकालेनें म्हटल्याप्रमाणें गोल्डस्मिथचें लिहिणें तितकें विश्वसनीय नसेल; त्यानें ठरावलेलीं तत्त्वेंही चुकीचीं असतील; परंतु प्रत्यक्ष अवलोकनानें जी माहिती त्यानें मिळविली त्यांतील सामान्य वर्णनसुद्धां अविश्वसनीय असेल असें म्हणतां येणार नाहीं. ‘ जुलमी राज्यपद्धतीमध्येंसुद्धां संसार-सुखनदीचा प्रवाह सतत वाहतो. त्यास कशाचाही अडथळा येत नाहीं ( छे. ८ क. २३ ) ही गोष्ट कवीच्या मताप्रमाणें जरी कदाचित् दिसून आली, तरी तशा स्थितींत तें सुख फार वेळ टिकेल याचा नेम नाहीं. विशेषतः धार्मिक जुलमामुळें कित्येकांच्या गृहसौख्याची राखरांगोळी झालेल्याची साक्ष इतिहास देत आहे. ’ तसेंच ‘ मनुष्याचा आपल्या कर्मावर जर पूर्ण ताबा आहे, तर सुखी होणें ही गोष्टही आपलेच अधीन आहे.’ ( छे ८ क. २१ ) असा कवीचा सिद्धांत जर खरा धरला, तर त्यानेंच उदाहरणादाखल दिलेल्या इटलींतील लोकांची स्थिति इतकी निकृष्ट कां व्हावी कीं, चिरकालीन प्रतिरोधाच्या योगानें त्यांच्यामधून सगळे उत्कृष्ट हेतू व आकांक्षा यांचें उच्चाटन होऊन स्वात्मोन्नति होणें ही गोष्टसुद्धां तेथें अशक्य व्हावी. सुखी होणें ही गोष्ट त्यांचे हातची नव्हती काय ? ते जीं कांहीं कर्में करीत त्याबद्दल ते जबाबदार नव्हते काय ? तेव्हां उदाहरण व त्यापासून काढलेलें प्रमेय यांत मेळ दिसत नाहीं ’ असे दोन आक्षेप प्रस्तुत काव्यावर घेतले जातात. परंतु तसें करतांना ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, सिद्धांतरूप ज्या कविता काव्याच्या शेवटीं आहेत त्या खुद्द गोल्डस्मिथच्या नसून जानसनची त्यावरील ती मखलाशी होय. ही गोष्ट काव्याच्या एकंदर झोंकावरून सहज लक्षांत येते. व म्हणूनच त्यांत वरील असंबद्धता शिरली आहे. तेव्हां वरील दोषांचें खापर कवीच्या माथीं फोडण्यास आम्ही केव्हांही तयार नाहीं. दुसरे दोष प्रस्तुत काव्यांत मुळींच सांपडणार नाहींत असें नाहीं; परंतु यांतील गुणबाहुल्यामुळें ते उपेक्षणीय आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे

काव्यांतील दोष वजा घालतां वाचकांचें मन यांतील सौष्ठव, सरळ रचना-पद्धति, साधें तत्त्वज्ञान, अनलंकृत भाषेंत केलेलें वर्णन, खरा स्वदेशाभिमान, दीन व दुबळ्या जनांबद्दलचा कनवाळूपणा, देशबांधवांच्या निकृष्ट स्थिती-बद्दल वाटलेली तळमळ वगैरे गुणांनीं वेधून जातें. इंग्रेजी वाङ्मयांत या काव्यास जें बरेंच वरचें स्थळ मिळालें आहे तें याच गुणामुळें होय.

अशा, सर्वोत्कृष्ट नसलें तरी, एका उत्तम काव्याचें भाषांतर आह्मीं मराठी भाषेंत केलें आहे. इंग्रेजींतील ज्या कांहीं काव्यांचीं भाषांतरें मराठींत झालीं आहेत, त्यांची संख्या पाहूं गेल्यास बोटावरच भरेल. रा. प्रधान यांची 'दैवसेनी' स्काटच्या एका काव्यांतील थोड्याशा भागाचें रूपांतर होय. क. कीर्तीकर यांची 'इंदिरा' टेनिसनच्या 'प्रिन्सेस' चें रूपांतरच होय. 'सुवर्णदुर्गांतील कैदी' हें बायरनच्या 'प्रिझनर ऑफ शिहान' चें रूपांतर, तर 'गिल्पिनचरित्र' हें कूपरच्या एका विनोदी कवितेचें भाषांतर आहे. गोल्डस्मिथ्च्या 'डिझर्टेड व्हिलेज' या काव्याच्या मराठींतील 'माझा ओसाड पडलेला गांव' हें रूपांतर व 'विजनपुरी' हें भाषांतर अशा दोन कृती आहेत. याशिवाय मिल्टन, टेनिसन, वर्डस्वर्थ, शेली, बर्न्स वगैरे कवींच्या चुटक्यांचें भाषांतर अगर रूपांतर बरेंच दृष्टीस पडत आहे. अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेलें रा. हवलदार यांचें 'इलिअड' ही मूळ काव्याचें भाषांतर आहे. एवढेच काव्यग्रंथ परभाषेंतून मराठींत आले आहेत. आतां भाषांतर चांगलें कीं रूपांतर चांगलें या नादांत जरी पडलें नाहीं तरी कोणासही एवढें कबूल करावें लागेल कीं, मूळ कवीचे विचार, त्याच्या कल्पना, त्याच्या देशांतील स्थिति, त्यांतील रीतिरिवाज वगैरे गोष्टींचें ज्ञान पाहिजे असेल तर तें रूपांतरानें न होतां भाषांतरानेंच साध्य होणारें आहे. शिवाय निरनिराळ्या देशांतील समाज, धर्म, समजुती यांत इतकें अंतर असतें कीं, त्याचें रूपांतर करणें म्हणजे सगळ्या गोष्टी बदलणें अगर भिन्न भिन्न आचाराविचारांची एकत्र खिचडी करणें होय. आपल्याच देशांतील आचाराविचारांच्या सतत परिशीलनानें

ज्यांची जिव्हा व कर्ण हीं चटावून गेलीं आहेत, त्यांना परकीयांच्या आचाराविचरांचा विटाळ वाटावा यांत आश्चर्य नाहीं. परंतु जिवंत समाजास व जिवंत वाङ्मयास असले निर्बंध निरर्थक होत. ज्यांचें सारस्वत डबक्यांतील पाण्याप्रमाणें सांचवणीचें झालें नाहीं, त्यांना अमुक विचार अमुक भाषेला शोभतील असें वाटणार नाहीं. जिवंत भाषेला विशिष्ट विचाराची व विशिष्ट नांवाची जरूरी नसते. ती स्वैर संचारिणी नदीप्रमाणें वाटेल तो प्रदेश आपलासा करून टाकिते. तिच्या वेगास कोणी कसलाही अडथळा आणूं शकत नाहीं. अशी जर खरी स्थिति आहे तर वाङ्मयानें भाषांतराला एवढें भिण्याचें कारण नाहीं. उलट त्यानें वाङ्मयांत भरच पडते. मूळ कवीच्या कल्पना, निरनिराळ्या देशांतील लोकांचें त्यानें केलेलें वर्णन याच गोष्टी आम्हांस महाराष्ट्रापुढें ठेवावयाच्या असल्यामुळें आम्हीं मूळ काव्याचें रूपांतर न करतां भाषांतरच केलें आहे. अर्थात यावरून मराठी वाचकांना मूळ कवीची ओळख पटल्यास आमचें कार्य तर अंशतः होईलच, पण त्यापेक्षां उच्च हेतु म्हणजे आपणांहून सर्वस्वी भिन्न अशा परकीय लोकांच्या समाजाचें ज्ञान होऊन एकंदर मानवजातीविषयीं कोणांस कांहीं प्रमेयें ठरवितां यावींत हा होय. शेवटीं काव्याच्या उपसंहारांतील तीच आशा पुनरपि प्रदर्शित करून गणपति करण्याची हांव धरली असतां कौशल्यहीनतेनें हातून वानरच झाला असल्यास त्याबद्दल क्षमा मागून हा लांबलेला उपोद्घात येथेंच संपवितों.

मनोरंजक पुस्तकमाला कचेरी, भोर.
ता. २० मे १९१६.

कर्ता.

१३३०
आ०२१ ३५८

# प्रवासी

अथवा

## समाजनिरीक्षण काव्य.

## छेद पहिला.

### सुखाचा शोध.

विषय–कितीही लांबचा प्रवास केला तरी आपल्या बंधूबद्दलची प्रीति यत्किंचितसुद्धां कमी होत नाहीं असें कवि प्रारंभीं प्रतिपादित आहे. आपल्या भावास व बालमित्रांस आशीर्वाद देऊन जेथें पाहुण्यांना नेहमीं आदरातिथ्य मिळतें अशा त्यांच्या घरांचे व त्यांतील मेजवान्यांचे कवि धन्यवाद गात आहे ( क. १ ते १४ ); त्याचें स्वतांचें असें जगांत कोठेंही घर नव्हतें, तेंव्हां कोठें तरी सुख सांपडेल या उद्देशानें तो या देशांतून त्या देशांत प्रवास करून शेवटीं आल्प्सपर्वताचे एका उंच टोंकावर बसतो; तेथें सभोंवतालीं दिसणाऱ्या प्रदेशांसंबंधीं त्याचे मनांत विचारतरंग येऊं लागतात ( क. १५ ते २३ ); एकाद्या उद्दाम तत्त्ववेत्त्याच्या विचारसरणीप्रमाणें नव्हे; तर अंतःकरणांतील खऱ्या कळकळीनें व कांहीं दुःख व कांहीं सुख अशा संमिश्र भावनेनें तो विचारमग्न होतो ( क. २४ ते ३६ ); पृथ्वीवर कोठेंतरी संपूर्ण सुख सांपडेल अशी त्यास आशा वाटते ( क. ३७ व ३८ ).

फिरतों दूर विदेशीं तेथ विनोदन मना करायास
अलसा 'षेल्ट्[1]' नाम नदी जिथें अनुत्सुक दिसे वहायास, १
कुटिला वा 'पो[2]' नामक अपगातीरीं पुढें तिथें अथवा
'[3]कॅरिंथिअ' जन जेथें वसती, वृत्ती यदीय बेपरवा, २
येतां पांथ घरातें शरणार्थी दीन ओढुनी दार
घेती, अकरुण ऐसा दाखविती जे तयास सत्कार, ३
तेथें वा '[4]कॅंपनिआ' देशीं जन विरल राहती जेथें
[5]उद्वेजित [6]खिलभूमी दिगंतपर्यंत विस्तृता दिसते ४
भाऊ ! जिथें जिथें मी भटके नगरांत वा अरण्यांत
परदेश पाहण्यास्तव, सौख्य परी लाभतें न एकांत. ५
कारण, विषण्णमानस एकाकी मंदमंद मी फिरतों,
त्वद्रक्त अंतरात्मा, सोडुनि मजला, तुझ्याकडे वळतो. ६
अद्यापि तीव्रदुःखावेगें तुझियाकडेस हा पळतो;
मी जाइ दूर जों जों, लांबतसे प्रेम[7]शृंखला तों तों ७
लाभोत भोग शाश्वत बंधूतें, सर्व बालमित्रांतें
रक्षोत नित्य त्यांच्या प्रसन्न गृहदेवताहि गेहातें. ८
धन्य स्थल तें जेथें दिवसान्तीं हृष्ट पांथ जमताती,
ज्वलनोत्सुक[8] ते विश्रम व्हाया हसनी[9]सभोंति बसताती. ९

---

१ षेल्ट् नामक नदी फ्रान्सचे उत्तरेस उगम पावून बेल्जम व हालंड या देशांतून वहात जाऊन उत्तर समुद्रास मिळते; तिचा प्रवाह फार मंद आहे. २ पो नदी इताली देशांत आल्प्स पर्वतावर उगम पावून आद्रिआटिक समुद्रास मिळते. तिच्या प्रवाहास फार वळणें आहेत. ३ कारिंथिआ हा आस्ट्रिआंतील इलीरिआ प्रांताचा एक भाग आहे. ४ हा प्रांत इतालींत नैर्ऋत्य दिशेस आहे. ५ ओसाड. ६ न नांगरलेली जमीन. ७ प्रेमी माणसें जों जों दूर जातात तों तों त्यांच्या प्रीतीच्या सांखळीस एकेक नवीन दुवा जडत जातो. ८ शेकण्याकरितां उत्सुक झालेले. ९ शेगडी.

गृह तें धन्य असे जें आश्रयितें दीन दून जे येती,
सत्कारी सर्वांतें अर्पुनिया परम आदरें शांति. १०

मिष्टान्न भोजनें तीं धन्य खरी खर्च सान होऊन
तोषास पूर्ण देती, पडे जयांत न कधींहि अणु ऊन ११

कौटुंबिक जन अवघे ईषल्लोहितकपोल ज्या जागीं
हसती हास्य-विनोदीं, निश्वसती शो कप कथाभागीं; १२

करुनी अमोघ-चेष्टा नर्मालापें परांस रंजविती;
असती जे अभ्यागत[1] लज्जायुत त्यांस फार आग्रहिती. १३

सत्कारसक्त ऐसे झाले सुकृती हितार्थ झटते ते-
धरितों, दिवशीं दिवशीं त्यांची संवृद्धि होउं, आशेतें. १४

परि मी, वाटें मजला कीं प्राणी एकला असें जगतीं
दुर्भाग्याहत, म्हणुनी अशीं सुखें ना मला कधीं मिळती. १५

तारुण्यकाल माझा, आयुष्याचा वसंत सुखपूर्ण,
गेला नानादेशभ्रमणीं चिंतानलीं वृथा तूर्ण. १६

जैसें दिगंत मनुजा क्षोणीमुखचुंबनप्रसक्त[2] दिसे.
लोभवि दुरून कुतुकें, परि जातां तो समीप तेथ फसे. १७

तैसें प्रकृष्ट सौख्यास्पद फल जें आशुलभ्य अस्थायि
प्रेरितसें मज घ्याया संतत, झटतां पळून परि जाई. १८

मद्भागधेय लावी मज एकाकी परस्थ देशांत
भ्रमवाया, परि गवसे शांति कुठेंही परा न जगतांत १९

अद्यापि ‘ आॅल्प्स ’[3] नामक नगशिखरावरि विविक्त उत्तुंग
बसतों विषण्ण मी तरि मनःप्रशांत्यर्थ होउनी गुंग २०

बसुनी उच्चप्रांतीं, वाताहतितेंहि जो नसे ज्ञेय,
बघतों अधःप्रदेशीं नानाविध देशभाग रमणीय. २१

---

१ पाहुणे. २ पृथ्वीचें मुख ( क्षितिज ). ३ हा पर्वत इतालीचे उत्तरेस आहे.

भास्वर सरोवरें हीं, दुर्गम तैशींच घोर कांतारें,
जनसंकुल नगरेंही, विस्तृत समभाग भूमिचे सारे, २२
वसती नराधिराज अनिश मदें विभवसौख्यरत जेथें,
नतमद कृषीवलातें विपुला पशुधान्यवृद्धि वा होते. २३
ऐशी विराजते जी सृष्टीची अतुल चारुता भंवती
आश्चर्य थोर ! दर्पें कैसे उपभोगिती न जन लव ती ? २४
दर्पानें अवमानी मानव जो या निसर्गविभवास
हतभाग्य तोचि, शोभे 'कृतघ्न' नामचि तयासि हें खास. २५
सांगे, प्रगल्भमतिनें तुच्छ करावेत तात्त्विकें काय
ते लाभ, विनीतात्मा ज्यायोगें तुष्ट होउनी जाय ? २६
नाकारोत सुखें ते दर्पें शास्त्रप्रवीण गुण अवघे;
परि अल्पतर जरी ते, होति महत्तर तरी लघूसि[3], बघे[4]. २७
नर साच धन्य तो, जो परोपकारीं झटे सदा हर्षें
समसंवेदक ज्यांचें मन अन्योत्कर्ष पाहुनी हर्षे ! २८
अयि नगरींनो ! शोभायुक्त श्रीविभवबुद्धिचें धाम;
क्षेत्रानो ! मुक्तकरें वसंत वितरी जिथें प्रचुर कामें; २९
तुम्हिही सरोवरानो ! जेथें अनुकूल वात साधोनी
नेती स्वच्छंदें जन विलासनौका यथेष्ट बैसोनी; ३०
आहो कृषीवलानो ! कृषिकर्मीं श्रमुनि जे अविश्रांत
भूषविती फलपुष्पीं दरीप्रदेशां निरंतर नितांत; ३१
मजसाठीं सर्व तुम्ही अपुली उपहारराशि एक करा;
सृष्टीचा या अवघ्या वारस मी, ही असे मदीय धरा. ३२

---

१ सृष्टीनें दिलेल्या संपत्तीचा उपभोग घेतला नाहीं तर मनुष्य कृतघ्न नव्हे तर काय होणार ? २ खुशाल. ३ तत्त्ववेत्त्यांना ते लाभ जरी हलके वाटतात तरी नम्रात्म्याला ते फार महत्वाचे वाटतात. ४ ही गोष्ट पहा. ( आपल्या भावाला उद्देशून म्हटलें आहे ). ५ इष्ट वस्तु. ६ मी सृष्टीचा वारस असल्यामुळें तुम्हांपाशीं तिला देण्याकरितां ज्या कांहीं वस्तु असतील त्या एकत्र करून मला खंडणी दाखल द्या.

प्रच्छन्न जाउनीया कृपण जसा आपुल्या धनागारीं
वारंवार विकल्पें बघतो संपत्ति मोजुनी सारी; ३३

अगणित धनराशीनें हृष्ट तदात्मा मुदें जरी भरतो,
दिसते उणीव अजुनी सोडी निश्वास दीर्घ यास्तव तो. ३४

तैसे मदंतरीं या विरुद्ध उठती विकार[1] पर्यायें,
तोषुनि जातां भाग्यें ईश्वरदत्तें न हर्ष मनिं मांये[2]. ३५

परि भाग्यश्रेणी ती स्वल्पतरा पाहतों मनुष्याची,
निश्वसितों मी तेव्हां, अनेकदां येइ लाट दुःखाची. ३६

जगतीं जिथें फिरे मी, धरी तिथें सर्वकाळ ही आस,–
' दैवें ध्रुवसौख्याचा देशीं या सांपडेल मज वास. ' ३७

' होइल बहुत मदात्मा प्रवासयोगें जिथें जिथें श्रांत
' संतृप्तकामजनता बघुनि, तिथें होउं तो सुखी शांत. ३८

---

# छेद दुसरा.

## सुखाचा विचार.

**विषय**–कवीची संपूर्ण सुख सांपडण्याबद्दलची निराशा होते. कारण निरनिराळ्या राष्ट्रांमधील लोक तें सुख आपणापाशीं आहे असें मोठ्या प्रौढीनें सांगतात, व प्रत्येक देशाभिमानी तसें जोरानें प्रतिपादितो ( क. १ ते ६ ); खरें पाहूं जातां प्रत्येक देशांत सुखाचा अंश खात्रीनें असतोच ( क. ७ ते ११ ); कारण प्रत्येक ठिकाणीं सृष्टीनें नैसर्गिक तत्त्वास अनुसरून मनुष्याचे उदरनिर्वाहासाठीं कांहीं तरी साधन करून ठेविलें आहे.

---

१ हर्ष आणि शोक. ( हे विरोधी विकार कसे उत्पन्न होतात हें खालीं व्यक्त केलें आहे. ) २ मावतो.

( क. १२ ते १४ ); तसेंच प्रत्येक देशामध्यें तेथील लोकांस आवडतें असें सुखाचें एकादें साधनही उत्पन्न करण्याची तिनें तजवीज केली आहे. मात्र त्या साधनाचा अतिक्रम झाल्यानें तेंच सुख उलट दुःखास कारण होतें ( क. १५ ते २० ); वर सांगितलेलीं तत्त्वें कांहीं दृश्य उदाहरणें घेऊन कवि सिद्ध करितो ( क. २१ ते २३ ).

कोठें परंतु जगतीं प्रदेश तो सौख्यधाम गवसेल ?
सगळे वृथाभिमानें अंध, तिथें मार्ग कोण सांगेल ? १
हिमकृतकंपिततनु जन सुशीत कटिबंधिदेशिं जे वसती
'सुखपूर्ण आमुची ही भू' ते निःशंक घोषणा करती २
झंषयुक्तक्षुब्धार्णवविभवा ते नित्य वानिती फार
निज दीर्घ रात्रिंना ज्या जाती पानोत्सवांत अनिवार. ३
धापा टाकित धर्में निवस्त्र निग्रो निरक्षदेशांत
निज तालमद्य, कांचनसिकता यांहीं सदर्प होतात. ४
शीतोष्णनिम्नगांतरिं रविकरसंतप्त होउनी शिरती,
उपकृति कृतज्ञ मानस धरिती ते ईशचिंतनांत रति. ५
ऐशी स्वदेशभक्त-प्रौढी दिसते जिथें जिथें फिरतों,
प्रत्येक 'मायभूमि स्वर्गाधिक मम पराग्रणी' वदतो. ६
दैववशें परि सुज्ञें समस्त देशास या जरी तुळिलें,
सृष्टीनें कोणातें दिधलीं सुखसाधनें किती गणिलें, ७
गावोत स्तुतिपाठक निजदेशाचे सदैव पाठ सुखें
देशैकप्रिय अथवा व्यक्तहि अपुला करोत भाव मुखें, ८
तरि सर्वत्र तयांतें अविकृतचित्तें दिसोनिया येतें
कीं, दिधला परमेशें सकलां समसौख्याभाग जनतेतें. ९

---

१ मासे. २ भूमध्यप्रदेशांत तालवृक्षापासून निघालेली दारू व सोन्याचे कण मिसळलेली वाळू विपुल असते. ३ खुशाल.

कारण, कलाविनिर्मित नैसर्गिक जे विभिन्न गुण असती,
पडतां एक तयांतिल उणा, तिथें करितसे दुजा भरती; १०
त्यायोगें न्यूनांगीं[1] उपयोगी ते परस्परां येती;
भिन्नप्रदेशभागीं तुल्य जनांचीं सुखें अशीं होतीं. ११
जननीच सृष्टि साक्षाद् दयार्द्र, समभाव सर्व पुत्रांशीं,
होता कर्मोद्यत ते सदैव अर्पी तयांस सुखराशी. १२
बहुसाल धान्यवृद्धी होते सम्यक् कृषीवलालागीं
'इद्रा'[2] नगप्रदेशीं, 'अर्नो'[3]च्या जेविं निम्न भूभागीं[4]. १३
भ्रूभंगपात करुनी निष्ठुरसा शैलकूट जरि बघतो,
परि तो परिचययोगें मनुजाला मृदुलतल्पसा[5] बनतो. १४
उत्पादिलीं कलेनें सौख्यें जीं तीं अनेकविध जगतीं,
व्यापार, वित्त, गौरव[6] तैसें स्वातंत्र्य, तृप्ति हीं असती. १५
इतुका तथापि दृढतर परस्परांशीं विरोध हीं करिती
कीं, प्रत्येक[7] दुजाचा दिसतें प्रध्वंसहेतु संपातीं[8]. १६
द्रव्य, स्वातंत्र्य जिथें, तेथें ना आत्मतुष्टितें वाव;
व्यापार जेथ पसरे, रुचे न मोठेपणास तें ठांव[9]. १७
होउनि राष्ट्रें अवघीं एकैकप्रियविशिष्टगुणसक्त[10]
अनुसरुनि त्या गुणातें वृत्तींतें बनवितात निज युक्त. १८
सावध आवडत्या निज तत्त्वाच्या पालनीं सदा दिसतो.
प्रत्येक देश, दुसरीं त्यजितो सुखकारणें अवज्ञें तो १९

---

१ जेथें एकादा गुण कमी असेल तेथें. २ इद्रा नांवाच्या डोंगराळ प्रदेशांत. हा प्रांत कार्नेलियांत आहे. ३ अर्नो नदी इतालीच्या मध्यप्रदेशांत आहे. ४ सकस अर्थात् अर्नोच्या सुपीक प्रदेशांत. ५ मऊ बिछान्याप्रमाणें ( परिचयाच्या योगानें अप्रिय वस्तु प्रिय होते ). ६ मानमान्यता. ७ प्रत्येक सुख. ८ विरोधांत. ९ ठिकाण (व्यापाऱ्यांना आपली मानमान्यता व्हावीच अशी इच्छा नसते). १० सारे देश आपणास आवडत्या अशा एकेक विशेष गुणाच्याच मागें लागले आहेत.

अत्यंतातिक्रम त्या [1]तेथें सुखहेतुचा जई होतो,
उत्पादितो तदा तज्जनित विशिष्टासुखास अंतीं तो. २०
सूक्ष्मविचारें परि हीं तत्त्वें पाहूं निरीक्षुनी सगळीं,
शोधूं तत्कार्यफलें तेथें, आहेत देश जे जवळी. २१
टाकूनि दूर सहसा क्षणभर चिंता मदीय मी बसतों
येथ शिलेवरि, जनतादुःखाची मनिं विचारणा करतों. २२
तेथें जशी उपेक्षित वेली वाढुनि यदृच्छया माजे
वातवशें निश्वसिते प्रतिक्षणीं, तदुपमा मला साजे. २३

---

# छेद तिसरा.

## इतालीची सामाजिक स्थिति.

विषय—पहिल्या प्रथम इताली देशाची स्थिति परीक्षिली आहे. या देशांत निसर्गसौंदर्य विपुल असून जमीन सुपीक आहे ( क. १ ते १० ); परंतु सत्ता व विपुल संपत्ति यांचे योगानें जे जे दोष उत्पन्न होतात, त्या सर्व दोषांनीं युक्त असा येथील रहिवाशांचा विचित्र स्वभाव आहे. त्यामुळें जे लोक थोडे वर्षांपूर्वी संपत्ति, व्यापार व कला वगैरेच्या उच्च शिखरावर होते, तेथून ते आतां च्युत झाले आहेत ( क. ११ ते २१ ). मुलांस साजेल, असा पोकळ डौल बाळगून त्यांनीं आपल्या पूर्वींच्या उत्तम गुणांना, सांप्रत रजा दिली आहे ( क. २२ ते ३३ ).

सश्रीकगगनचुंबी ‘ आपिनि ’ नगराज राजतो जेथें,
दक्षिणभागीं ग्रीष्मप्रभ ‘ इटली ’ देश शोभतो तेथें. १

---

१ त्या देशांत. २ अतिक्रम झाल्यानें कोणतेंही सुख असुखास कारण होतें.
३ इतालीमधील एक पर्वत.

कटकप्रांत नगाचे सालंकृत होति वन्यनवविभवें,
स्पर्धा या शोभेशीं येथें कोणा दुजास ना करवे. २

श्रेणी वृक्षवरांच्या एकाहुनि एक उंच या चढत्या
रांगा बसावयाच्या नाट्यगृहांतील जाहल्या दिसत्या. ३

शिखरें जीर्ण जयांचीं दिसती देवालयें अशीं मधुनी
भक्त्यादर भावद्वय उचंबळे जनमनीं तया बघुनी. ४

होतें जगद्विधात्रीदत्तें विभवें प्रतुष्टचित्त, तरी
इटलीचे असते प्रियपुत्र खरोखर निमग्न सुखनिकरीं; ५

जीं जीं फलें विनिर्मित होतीं भिन्नप्रदेशमाझारीं
उंच तरूवरि, खालीं भूवरि वा वृक्ष वांकतां भारी; ६

जीं जीं पुष्पें अथवा दिसती रविपादतप्तदेशांत
नाना ऋतूंस होतो उद्गम ज्यांचा प्रसाधनीभूत; ७

जीं जीं उत्तर भागीं आमोदें भरुनिया दिशा दाही
कुसुमें व्यर्थ वसंतीं फुलती, सुकती अभुक्त मधुवाही; ८

तीं सर्व येथ वाढुनि करिती प्रकट स्वभूमिची साची–
संवृद्धि स्वाभाविक; किमपि अपेक्षा दिसे न कष्टाची. ९

शिशिरपयःकणवाही पसरी पंखां समुद्रवात निज,
ऐश्वर्यशालिदेशाभोंतीं विकरी सुगंध तो सुम-ज. १०

केवल विषयोद्भव जीं असति सुखें अल्पकाल टिकणारीं,
हो तींच नान्य येथें सकलांना अहह ! ठाउकीं सारीं. ११

उद्यानें क्षेत्रें हीं नटूनिया कुसुममंडनीं जाती;
अपकर्ष पावते परि भूतीं केवल इथें मनुजजाति. १२

त्यांच्या स्वभावफलकीं विरुद्धगुण भावरंग दिसतात;–
दीन जरी, विषयाकुल; हीन जरी, ते सदर्प होतात; १३

---

१ अलंकृत. २ ईश्वरानें उत्पन्न केलेल्या पदार्थांमध्यें.

गंभीर, क्षुद्रार्थी रत; कार्यातुरहि, ते मृषालाप,
कृतदोषप्रक्षालनकर्मीं नव नित्य योजिती पाप. १४
वित्तप्रणाश ज्या ज्या मार्गें दोषांस ठेवितो जगतीं
वसती सकल इथें ते, जनता येथील दूषिता करतो. १५
जन संपत्तिनगावर लोळत होते न काळ[2] बहु झाला;
व्यापारवृद्धियोगें उन्नतपद लाधलें प्रदेशाला. १६
प्रासाद तन्नियोगें उठले जणुं भेटण्यास गगनातें;
सजले दीर्घ विशीर्ण स्तंभ पुन्हां भेदण्यास अभ्रातें; १७
झाला चित्रकलेचा उत्कर्ष जिनें निसर्ग लाजविला,
[4]प्रतिमा ज्यांतुन घडल्या उणीव नव्हती अशा शिलाखनिला; १८
असते दक्षिणवात्याहूनि जिची लोल[5]वृत्ति जइं ऐशी
व्यापाराची येथिल नौका गेली वहात परदेशीं; १९
जेव्हां नुरले देशीं या कांहीं वित्तलब्ध जें होतें;
नगरें निर्जन झालीं; दासाविण धनिकही जईं येथें; २०
दुर्दैवें[6] अंतिकालीं तें राष्ट्रां समजलें, वृथा झाले,
' झालें स्वपूर्ववैभव शोथरुजोत्पत्तिहेतु ' कीं ' काळें. ' २१
ऐश्वर्यहानि झाली त्यांची जी ती भरूनिया आली
शिल्पक्रियावशिष्टें, जागीं जीं गतविभवदर्शकें झालीं. २२

---

१ खोटे बोलणारे. २ दुर्गुणास. ३. १३ व्या शतकापासून १५ व्या शतकापर्यंत इतालींतील लोक व्यापारानें अतिशय समृद्ध झाले होते. ४ मनुष्यांचे पुतळे. ५ व्यापार चंचल असतो असें कवि सांगत आहे. ६ वरील गोष्टी घडल्यावर, म्हणजे व्यापार संपुष्टांत आला, संपत्तीच्यामुळें जें मिळालें होतें तें नष्ट झालें, शहरें ओसाड पडलीं, व श्रीमंतांना सेवकसुद्धां ठेवण्याची ऐपत नाहींशी झाली, तेव्हां आपलें पूर्वीचें वैभवच अतिक्रमरूपी अजीर्णाच्या विकारास कारण झालें, ही गोष्ट फार उशीरानें समजली व ह्मणून तें समजणें व्यर्थ झालें.

जनता निर्बल चिरपरवश जी दिसते, तियेस या योगें
झाली गतबल[1]वैभवपूर्ति, तिनें ती प्रमोदसुख भोगे; २३
शोणित[2]पातविहीनैश्वर्यविभूषित दिसोनिया येते
अश्वारोहश्रेणी, तैसा कृत्रिम जयोत्सवाहि येथें; २४
संमानार्थ तयांच्या येथें जन नित्य काढुनी यात्रा
चिरशांतिंत वसती जे तपास्विजन, वल्लभाहि शुचिगात्रा; २५
पूर्वार्जित शौर्याचें त्यांच्यांतुनि सर्व लोपलें वारें;
धर्मासक्ति, विशुद्ध प्रेम तयां खेळ हो अतां सारें. २६
ऐशा विनोदचेष्टा करुनी चिंता स्वकीय विस्मरती;
बालांस शोभती बहु बालिशलीला, न त्यांत सुजनरति. २७
लोपुनिया चिरकाल[3]प्रतिरोधित उच्च हेतुही सगळे
जाती समूळ अथवा आत्मत्राणांत होति हीन[4] बळें. २८
ग्राम्योपभोग सत्वर, हेतूंचा नाश उच्च त्या होतां,
होती प्रचलित येथें, क्षुद्रसुखीं तुष्ट राहते जनता. २९
पूर्वी प्रभुत्व जेथें गाजविलें रोमबादशाहांनीं
कालें जर्जर झालें तें स्थल कंपें घडोनि जणुं हानि. ३०
परिसुनि पूर्वजते[5]जो वैभवविषयांसि ज्यांसि कांहीं न

---

१ इतालींतील जनता निर्बल व परतंत्र झाली. त्याचें वैभव नष्ट झालें. तथापि या कारणानें त्यांच्यांत जी उणीव पडली ती तेथील शिल्पक्रियेच्या अवशिष्टामुळें भरून आली. लोक वैभव गेल्याचें दुःख न मानून त्या अवशिष्टांतच आनंद मानूं लागले. २ पूर्वी रोममध्यें सर्व नगरभर विजय संपादून आलेल्या योद्ध्यांची त्यांचे संमानार्थ सैन्यानिशीं जंगी मिरवणूक काढीत असत; व मोठमोठे उत्सवही करीत असत. हल्लीं सुद्धां त्या धर्तीवर तेथें मिरवणुकी व जयोत्सव करितात, परंतु ती मिरवणूक व तो जयोत्सव लढाईतील पराक्रमामुळें नसल्याकारणानें पोकळ दिसतात. ३ पुष्कळ काळ उच्च हेतूवर दाब ठेवून त्यांना वाव दिला नाहीं ह्मणजे ते अजीबात नाहींसे तरी होतात, किंवा त्यांच्यापासून जें उन्नतीचें कार्य व्हावयाचें तें करण्यास ते निरुपयोगी तरी ठरतात. ४ कमी. ५ पूर्वीचे रोमन लोक संपत्तीची व वैभवाची इच्छा करीत; परंतु सध्यांचे लोक राहण्याकरितां एकादी जागा मिळाली अगर अशाचसारख्या दुसऱ्या क्षुद्रसुखांत संतुष्ट राहिलेले दिसतात.

वाटे अभिमानाचा लेश कृषीवल असे उदासीन– २१
धरुनी क्षुद्रारामीं वांछा या संप्रती प्रदेशांत
बहुजीर्णशीर्णसौधावलिमधुनी निज कुटीर रचितात. २२
आश्चर्युनी ' वृथा जनिं इच्छावें अधिक सौख्य कां मनुजें ?
आनंदती स्मितें तें अपुलीं पाहूनि सानशीं उटजें. २३

---

# छेद चवथा.

## स्वित्झर्लंदची सामाजिक स्थिति.

**विषय**–दुसरें उदाहरण स्वित्झर्लंद देशाचें घेतलें आहे. तेथील जमीन माळरान असून हवाही फार कडक आहे ( क. १ ते ५ ); तथापि तेथील लोक काटक व संतोषी असल्यामुळें त्यांना वरील अडचणी भासत नाहींत ( क. ६ ते ११ ); सारे लोक दरिद्री असल्यामुळें त्यांचीं सुखें फार साधीं आहेत ( क. १२ ते १८ ); व त्यामुळें आपल्या देशावर त्यांची फार भक्ति आहे ( क. १९ ते २४ ); परंतु त्यांना उत्कृष्ट गुणांची व उच्च भावनांची कांहींएक कल्पना नाहीं ( क. २५ ते ३९ ).

येथून काढुनीया लावूं निज चित्त अन्यदेशातें,
दिसती अभिजात[1] कुलें आधिक जिथें शीतलप्रखरवातें, १
'स्विस्' जन ओश्वेत[2] जिथें स्वकीय वाताहतीं गृहीं वसती;
नुरविति शैलक्षेत्रें कष्टाविण त्यास जीवनार्थ गती[3]. २
पाषाणप्रचुरा ही भू किमपि प्रसवते न फल येथें,
काढी अयस्खनींतुनि परि सड्गें, भटकुलास जनु[4] देते, ३

---

१ कुलीन सभ्य घराणीं. २ किंचित् पांढऱ्या वर्णाचे. ३ उपाय. ४ जन्म. स्वित्झर्लंद देशांतील जमिनी सुपीक नाहींत; तथापि तेथें लोखंडाच्या विपुल खाणी आहेत, व तेथील लोक शूर निपजतात.

भूषविती न कधीं या वसंतपुष्पें नगप्रदेशास,
हेमन्त मंदगामी टाकी खुडुनी निदाघकलिकास.[1] ४

येथें मरंदवाही मंदानिल वाहतो न गिरिपृष्टीं;
चपला परी चकाके, वर्षतसे सांधकार गुरुवृष्टी. ५.

करितो तथापि जीवित इथेंहि रमणीय आत्मसंतोष;
होई सुसह्य तेणें देशगुणोद्भूततीव्रतारोष.[2] ६

असतें कृषीवलाचें कुटीर निर्धन, मिळे कदन्न तया
खाया, परी तयाच्या जाई आमोद ना कधीं विलया. ७.

श्रमपरता, नीरसता, निर्धनता कष्टवी न त्यां, भंवतीं
कारण निज दुर्भाग्यीं सगळे समभाग बंधुजन दिसती. ८.

एकहि समीप भव्य प्रासाद इथें कधीं नभोभेदी
ऐश्वर्यें लाजवितो न नम्र कुटितें, न तत्सुखा छेदी. ९.

मिष्टान्नें न कुणीही धनाढ्य येथें यथेष्ट वाटतसे,
शाकामिश्रित तेणें भोजन नीरस कधीं न लागतसे. १०.

परि लोभहीन, वर्धित अज्ञानीं कष्टशील, म्हणुनी ते
संयमुनी सकलेच्छा होती संतुष्ट त्यांत जे पिकतें. ११

भोगुनिया मितनिद्रा, प्रभात कालीं प्रसन्नचित्तानें
उठती, प्रशीत मारुत सेवित जातात गात ते गाणें. १२

बांडिशें[3] जलाशयांतुनि मासे बाहेर ओढिती निपुण;
नांगरिती किंवा ते शैलक्षेत्रें हॅलें[4] बहु श्रमुन. १३.

वा हिमदेशीं[5] काढुनि पदचिन्हीं माग वन्य विवरांचा
बाहेर ओढिती पशु हिंस्त्र बलें प्राण घ्यावया त्यांचा; १४

---

१ या देशांत हेमंत ऋतु फार दिवस राहतो व त्यामुळें उन्हाळ्यांत फुलणारीं फुलें उगवत नाहींत. २ देशांतील स्वाभाविक ( थंडीची ) तीव्रतारूपी रोष. ३ आंकड्यानें. ४ नांगरानें. ५ बर्फमय प्रदेशांत.

परतुनि सायंकालीं गेहासी कार्य सर्व संपवुनी.
येती निर्धन भूपति[1] अपुल्या पर्णावृतालपशा सद्नीं. १५
बैसुनि हसनीभोंतीं हसती, प्रेमें चहूंकडे बघती
प्रियबालकांस, ज्यांचीं मुखकमलें रक्त दीप्तिनें[2] दिसती १६
सहधर्मिणी तयांच्या दृप्ता[3] ज्या स्वाल्पसंचयीं दयिता
ठेविति सुसज्ज पात्रें मेजावरि रात्रिभोजनाकरितां. १७
आला पांथ कदाचित तेथें कोणी चुकोनिया वाट,
रिझवुनि रम्यकथांहीं तयांस, तो मिळवि आपणा खाट[4] १८
ऐशीं इष्टफलें जीं श्रमतां या भूमिपासुनी होती
अंतःपुटीं जनांच्या प्रज्वालिति देशभक्तिची ज्योती. १९
असती उभे तयांच्या कुटीरभंवतीं सदैव तुंगगिरी,
करिती वर्धित तें सुख त्यांचा इथ अल्प कोष जें वितरी; २०
प्रिय असती तीं उटजें, आकांक्षा सर्व तृप्त जीं करती;
साच प्रिय शैलहि ते, तेणें वात्याकरीं[5] जरी पडती; २१
जैसे शिशु ऐकुनिया कठोरशब्दा मनीं भया धरितें
घट्ट मिठी हृदयाशीं मारी धांवून आत्म जननीतें, २२
तैशीच सर्व जनता परिसुनि येथील कातरा होते
निघणाऱ्या गिरिनिर्झरवात्यावलिपासुनी[6] महा ध्वनितें. २३
जों जों भयें थरारे मन पडतां घोष घोर कर्णपुटीं
तों तों गिरिप्रदेशप्रेमा तो त्यांचिया करी प्रकटी. २४
ऐशा सौभाग्यगुणा सृष्टीनें वंध्यभूमितें दिधलें;
केले परि आकांक्षाशून्य इथें अल्पतुष्ट जन सगळे. २५

---

१ जमिनीचे मालक. २ विस्तवाच्या उज्ज्वल तेजानें. ३ गर्विष्ठ. ४ स्वतःच्या निजण्याची सोय करितो. ५ त्यांचीं घरें डोंगरावर असल्यामुळें साहजिकच तेथें सोसाट्याचा वारा वाहत असतो. ६ डोंगरावरील ओहोळ व सोसाट्याचा वारा यांपासून. ७ घोष.

साजेलसें गुणांना फल त्यांना लाधलें असे खचित;
संतोष अल्प त्यांचा करितो सौख्येंहि अल्पतर उदित. २६
प्रत्येक कामें[1], जो करि यत्न करायास चेतना हृदयीं—
होतो साच सुखाचें कारण तो तृप्त जाहल्या समयीं. २७
परि सुप्त काम, यास्तव देशा या पारखी कला हो, जी
उत्पादुनि कामातें, मागुति तत्पूर्तिसाधनें योजी. २८
जातां कंटाळुनि बहु विषयसुखासी तयां[2] नसे ज्ञात
उद्वेजित कालाचा कसा करावा कलादिकीं[3] पात[4]. २९
अवगत ती विद्याहि न, जीनें मन उच्चभावनीं रमतें,
शिरुनी तनुगात्रीं जणुं मनुजां उत्साहपूर्ण जी करते. ३०
सतताविकृत[5] तयांचें जीवित अंतःप्रसुप्त वन्हिसम
उत्कटकामें ज्वलन न, जीवनकलहें न पावतें प्रशम[6] ३१
सारे मोदसुखाक्षम जन येथिल होत सर्वथा रतले,
अथवा जरी कदाचित ते प्रतिवत्सरमहोत्सवांत भले, ३२
तरि बनती मुदतिशयें ग्राम्यजनांपरिस ते सुरामत्त;
अश्लील वर्तनीं रत होतां तत्सौख्य होतसे लुप्त. ३३
केवल मोद तयांचा होतो ऐसा न नीचपथगामी,
त्यासम होति तयांचे नैतिक गुणही अनीतिपरिणामी ३४
कारण, संस्काराचा विलोप होई जसा जसा, होती
सुखशोधक[7] अपरीक्षित असंस्कृत तशा अनुक्रमें रीती. ३५
सायक[8] सौहार्दाचा, प्रीतीचा, तीक्ष्णकोटि जरि असला,
मोघ परी ठरतो तो येथें भेदावयास हृत्पटला. ३६

---

१ जीमुळें आपणांमध्यें यत्न करण्याविषयीं प्रेरणा होते ती इच्छा सफल झाल्यावर सुख देण्यास कारणीभूत होते. २ अज्ञात. ३ ललित कला. ४ व्यय. ५ प्रेरणारहित असणारें. ६ त्यांचें जीवित प्रबल इच्छेमळें उत्साहपूर्ण होत नाहीं किंवा जीवनकलहामुळें नाशही पावत नाहीं. ७ सुखाचा शोध करणाऱ्या (रीती). ८ बाण.

शौर्याभिमान दुष्कर भावहि या शैलवासिजनहृदयीं
वसती, व्यर्थ परी ते सगळे श्येनासमान निजनिलयीं. ३७
सौजन्यादिक सात्त्विकगुण परिभूषण सदैव दिसती जे
संस्कृत सभ्यसमाजीं, जीवनपथ जे उजाळिती तेजें, ३८
वैधर्म्यभीतिनें ते अवघे येथुनि उडोनिया जाती
विहराया विलसाया सधर्म-देशीं, जशी विहगजाती. ३९

---

# छेद पांचवा.

## फ्रान्सांतील समाजस्थिति.

**विषय**—तिसरें उदाहरण फ्रान्स देशाचें घेतलें आहे. तेथील आबालवृद्ध सारे लोक आनंदी व सुलभसंतुष्ट आहेत (क. १ ते. ९); परंतु आपण आपल्या देशबांधवांच्या कृपेस पात्र व्हावें व आपल्या स्वतःची प्रतिष्ठा मिरवावी एवढीच काय ती प्रत्येकाची सगळी हांव असते (क. १० ते १६); व त्यामुळेंच त्यांच्या मानासिक विवेचकशक्तीचा ऱ्हास झाला आहे, व त्यांच्यांत डामडौल व पोकळ अभिमान या दुर्गुणांचा फैलाव झाला आहे (क. १७ ते २३).

समधर्म त्या प्रदेशा वळतों मी राजते महोदार
जनरीति जेथ, उघडुनि गेहाचें फ्रान्स आपुल्या दार— १
दावी प्रदेश सारा, सौंदर्याची जिथें नसे वाण,
सामाजिक सौख्याचें, आनंदाचेंहि शोभनस्थान. २

---

१ बहिरीससाण्याप्रमाणें. या लोकांच्या अंगांतील शौर्यादि गुण घरट्यांत बसलेल्या श्येनाप्रमाणें निरर्थक होत. २ स्वभावास अनुरूप अशा म्हणजे फ्रान्स देशांत; (सात्त्विक गुणांस फ्रान्स योग्य आहे). ३ स्वभावास अनुरूप अशा.

संस्कृतिविभवें तुष्ट स्वयें सदा देश हा दिसे, त्यास
तोषविण्या कोणातें वाटे अल्पहि जनीं न आयास. ३
कितिदां तरी विलासी तुतारिनें तालहीन खुलवीला
नर्तकगण, मीं बसुनी गुंजल्[1]लायरसरित्तटाकीला, ४
होती विशाल येथें घनदूरप्रसृत–एल्मतरुराजी,
मंद सुगंधित वाहत होता वायूहि त्या स्थलामाजीं. ५
मंदकौशल्यें निघुनी बदसुर संतत तुतारिच्या मधुनी
गेलें जरि नर्तकपदतालस्वारस्य सर्व बिघडूनी. ६
वाखाणिलें तरी त्या ग्राम्यजनें बहु मदीय नैपुण्य,
केलें नर्तन नेणुनि झाला अति तीव्रतापमाध्यान्ह. ७
आबालवृद्ध सारे मिळले, संकोच ना कुणा कांहीं;
निज बालांस शिकविले विचित्रगतिताल वृद्ध मातांहीं ८
तैसेच नाचले बहु रंगेलहि वृद्ध नर्तनीं निपुण,
होते साठ वयाचे, परंतु जे भासले सदा तरुण. ९
ऐसें जीवित सुखमय दावी चिंताविहीन हा देश,
कालक्षेप करी निज बालिशचेष्टांमधीं जन अशेष. १०
नांदे निजप्रतिष्ठा[3]प्रवृत्ति सर्वत्र या समाजांत
व्हावें बंधुकृपेतें पात्र कसें म्हणुनि हें तया ज्ञात. ११
मग ती निजप्रतिष्ठा योग्यायोग्य स्तुतीस जनिं पात्र,
होवो वास्तव गुण[4]गणयोगें वा कल्पनागुणें मात्र. १२
चालतसे निर्भय ती येथें नाणें नसे खरें खोटें;
एकाकडुनि दुजातें प्रसृत अशी ती चहूंकडे होते. १३

१ लायर ही फ्रान्स देशांतील नदी आहे. २ माझ्या अकुशलतेनें. ३ आपली प्रतिष्ठा मिरविण्याची हांव. ४ ती प्रतिष्ठा अंगांतील खऱ्या गुणानें योग्य स्तुतीला किंवा काल्पनिक गुणानें अयोग्य स्तुतीला पात्र असो, पण तिचा प्रसार सगळ्या लोकांत झालेला दिसत आहे. ५ खऱ्या खोट्या नाण्याप्रमाणें ती प्रतिष्ठा बेधडक सर्व ठिकाणीं पसरते.

दरबारीं होय तिचा उटजिं तसा छावणींत संचार;
शिकले स्तुतिस्पृहेचे पाठ जणूं लोक सर्व आनिवार. १४
जात्या सुजाण म्हणुनी, असुनी ते तुष्ट, तोषविति अन्य,
संमानती दुजातें, कीं तो अपणां म्हणों सदा धन्य ! १५
ऐशा या मानाच्या परमसुखी विनि[1]मयामधीं दिसती
दिसती खरोखरी ते जैसे तैसेच अंतरीं असती. १६
रीति परी मानाची ही सुख वितरी जशी सदा त्यातें,
तैशी अमूप देई अवसर तद्दोषवृद्धि करण्यातें. १७
कारण, परप्रसंशाप्रीति प्रबला अपेक्षितां भारी
आन्तर विवेकशक्ती कुंठित करि सर्वथैव ती सारी. १८
मानव सदा बनोनी न[2]ष्टान्तसौख्यहेतु दुर्बलसा
होई सकल सुखास्तव परावलंबी सदैव याचकसा. १९
सर्वत्र प्रसृत तरी दंभ, मृषाचा[3]तुरी इथें दिसती;
ग्राम्यजनै[4]कोचित ते प्राकृतशंसाप्तिलागिं बहु झटती २०
अविनीत आत्मतृप्तिहि दावी वृत्ती अहंकृता येथें;
वस्त्रातें निज भरड्या खोटी लावूनि फीत सजवीते. २१
भिक्षाशनाभिमानहि वगळी स्वान्नोदकांतुनी रोज,
एक दिनीं मिष्टान्नीं वेंचुनि तें राखितो जनीं बोज. २२
मन सर्वकाल चंचलरीतीमार्गींचि दाससें धावें
अवमानुनि सर्वस्वी स्वात्मरुचि, जिनें तयास बोधावें. २३

---

१ एकमेकांस मान देण्याघेण्यांत आनंदी दिसतात. २ ज्यांमुळें अंतरी सुख होतें तीं कारणें नाहिंशीं होऊन. ३ खोटा बडेजाव. ४ हलकट लोकांस शोभेल अशा अश्लील स्तुतीच्या प्राप्तीकरितां. ५ गर्विष्ठ भिकारीसुद्धां रोज कांटकसर करून जमाविलेलें वर्षांतून एकाच वेळेला उडवितात, व अशा रीतीनें लोकांत आपला कमीपणा दिसूं देत नाहींत.

# छेद सहावा.

## हालंदची समाजस्थिति.

**विषयः**—चौथें उदाहरण हालंद देशाचें आहे. ह्या देशाची नैसर्गिक ठेवण अशी कांहीं विलक्षण आहे कीं, तेथील लोकांस उद्योग करणेंच भाग पडतें; व त्यामुळें यत्नैकशीलता हा एक त्यांचा जन्मतः गुणच बनला आहे ( क. १ ते ८ ). परंतु याच उद्योगप्रवृत्तीनें सर्व राष्ट्रभर सेवावृत्तीची चाड, कैतव इत्यादि दुर्गुणांचा फैलाव मात्र झाला आहे. उद्योगप्रियता, स्वातंत्र्याचा अभिमान वगैरे ज्या गुणांबद्दल त्यांचे पूर्वज प्रसिद्धीला आले त्या गुणांचा वरील दोषांमुळें सांप्रत लोप झाला आहे ( क. ९ ते १९ ).

भिन्न स्वभाव ज्यांचा ऐशा लोकांत कल्पना माझी
विचरे, वारिधिचतुरावेष्टित हालंददेश हो गाजी. १
अनलस येथिल भासे प्रजा उभी माझिया पुढें राहे,
बसला टेंकुनि जेथिल तटास उदधी विशाल दिसताहे. २
उद्धतवीचिश्रेणी येथें जन कष्टशील रोधाया
प्राकार उच्च रचिती निज शिल्पप्रौढताहि मिरवाया. ३
करुनी वाढविती सश्रम संतत सावकाश तो सेतू
दृढबन्ध, आंत तेणें घुसण्याचा जिरविती जलधिहेतू. ४
उपशाखा बहु नंद्यत्या लाटांमाजी सुदूर पसरोनी
तीरप्रांत हिरावुनि तो घेती सर्व, सिंधु हटवोनी. ५

---

१ हालंद देशांतील लोकांचा स्वभाव फ्रान्स देशांतील लोकांच्या स्वभावापेक्षां भिन्न आहे. २ घो घो करणाऱ्या. ३ समुद्रांत लांबवर बंधारे बांधून तो हटविला आहे, तेव्हां जणुंकाय त्याच्या तीरावरील प्रदेश मनुष्यांनीं काबीज केला आहे.

रुद्धप्रसार नंतर तो चढुनी सेतुच्या तटावरता
वेर्विष्णु खालती स्थलजलवासिप्राणिजात हो बघता. ६

मंदप्रवाहिकुल्या[3], सुपीतसुमरंजिता दऱ्या येथें,
लीलाप्रचारिनौका, सगुल्मतटभाग देत शोभेतें. ७

क्षेत्रें सुशस्यशाली, जनसंकुलपण्यवीथिका[4]हि तशी
अब्ध्या[5]धिपत्यमुक्ता जणुं करि ही सृष्टि मानवें नवशी. ८

कल्लोलाहतिभयपर ऐसा सर्वत्र होय हा देश;
आणी कष्ट कराया दीर्घ परी त्या जनीं महावेश. ९

यत्नैकशीलता बहु दावी मूलस्वभाव सकलांचा;
फलविपुलप्राप्त्युद्गम उद्योगानन्यवृत्तिवश साचा. १०

ऐश्वर्या पासुनि तें सद्गुण उद्भूत होति जे सगळे,
ते दिसती स्फुट येथें, तसेचि अतिरेकजात दोष भले. ११

नित्य तयांची परम प्रेमास्पद हीच संपदा वितरी
समृद्धिसौख्यशोभाफलादि नानाविलास नैकपरी[9]. १२

सूक्ष्मतया परि येथें निरीक्षितां, कैतवादिदोषगण
उरवी कुठें न खुद्द स्वातंत्र्याचाहि येथ एक कण. १३

सगळी स्वतंत्रता हो कनकालंघ्यप्रलोभनें विवशा,
विकतां अकिंचनांहीं ती तैं होई विशाल वित्तवशा. १४

जुलमी होय जनांची भूमि, तशि कंदरा गुलामांची;
जनता येथ अवशी म्हणुनी या कबर[11] दुष्ट दुबळ्यांची. १५

---

१ समुद्र. २ भरभराटींत असणाऱ्या. ३ सरोवरें. ४ दुकान ५ समुद्राच्या कचाट्यांतून मुक्त झालेली. ६ उद्योगावांचून पुष्कळ फलाची प्राप्ति होत नाहीं. ७ स्पष्ट ८ अतीशय आवडीची ( संपत्ती. ) ९ नानाप्रकारचे. १० श्रीमानलोकांचे अंकित. ११ येथें जुलमी लोक व गुलाम रहात असल्यामुळें त्यांना मेल्यानंतरही कोणी मान देत नाहींत.

वहतां जूं दास्याचें सेवास्थित[1] चित्त तें मलिनबुद्ध
वसती स्तब्ध सरांसम येथिल वात्यींहि हो न जी क्षुब्ध[2]. १६
अहह ! तयांचे होते पूर्वज 'बेल्जी' कितीतरी भिन्न !
अविजित, बलाढ्य, कंटक, दीनहि, संतुष्टचित्त, अविखिन्न[3], १७
युद्धप्रिय अतिशय ते तैसे स्वातंत्र्यभूषणीं सगळे
होते मंडित, नव्हते निज पुत्रांसारखे जनीं दुबळे १८
किति तरि अहो ! तसे या डचपुत्रांहून भिन्न आतांचे
पुत्र ब्रिटानियेचे समीपवर्ती अजिंक्यजन साचे. १९

---

# छेद सातवा.

## इंग्लंदची समाजस्थिति.

**विषयः**—पांचवें व शेवटचें उदाहरण इंग्लंद देशाचें घेतलें आहे. हा देश विशेषतः नैसर्गिक सौंदर्यानें भरून गेला आहे; व तेथील जनता बाणेदार व स्वतंत्रतापूर्ण आहे ( क. १ ते ११ ). परंतु ह्या स्वतंत्रतेच्या उद्देशाचा अतिरेक झाल्यामुळें समाजाचीं अंगें विस्कळित होऊन त्याचीं बंधनें तुटूं लागलीं आहेत. या कारणानें जिकडे तिकडे राजकीय पक्षभेद माजून गेले आहेत ( क. १२ ते १८ ). एवढेंच नव्हे, तर धर्मप्रीत्यादरादि सद्गुण दुर्बळ होऊन शेवटीं हा देश लोभाचा खंदक होईल अशी कवि इशारत देत आहे ( क. १९ ते २४ ). वरील दोष दाखविण्यानें मी स्वातंत्र्याचा द्वेष करतों असें नाहीं. परंतु त्याचा अतिक्रम होऊं नये म्हणूनच मी त्यांतील दोष दाखवीत आहें, असें कवि बजावीत आहे.

---

१ सेवेंतच दंग झालेले. २ ज्या प्रमाणें येथिल तलाव वादळांतसुद्धां क्षुब्ध होत नाहींत, त्याप्रमाणें येथील मंदबुद्धि लोक कशानेंही क्षुब्ध होत नाहींत. ३ आनंदी.

बुद्धिमंतवर्ग कामकरीवर्गापेक्षां श्रेष्ठ होय. प्रत्येक वर्गाच्या मर्यादा अंगच्या गुणांप्रमाणें ठरविल्या पाहिजेत. बंधनाचें ओझें प्रत्येक वर्गावर योग्य प्रमाणांत पडावें असा स्वातंत्र्याचा खरा उद्देश आहे. नाहींतर राष्ट्रांत एक पक्ष प्रबल होऊन दुसऱ्यास चेपून टाकील ( क २५ ते ३३ ). पक्षाग्रणी राजाची सत्ता कमी करून स्वतांची वाढवीत आहेत. परदेशांतून लुटून आणलेल्या संपत्तीचा विनियोग आपल्या दीन देशबंधूंची स्वतंत्रता हरण करण्याचे कामीं करीत आहेत; त्यामुळें कवीचें मन क्षुब्ध होत आहे व शेवटीं त्याच्या भीतीनें तो राजाकडे धांव घेत आहे ( क. ३४ ते ४३ ).

उद्बोधित होउनि या 'ब्रिटानिया,–कर्णरंजितध्वनिनें
मत्कल्पनाविहंगम मारि भरारी क्षणीं तडिद्गतिनें; १
उतरे दक्षिण[1]भागीं, जिथें वसंतावतार हो आधीं,[2]
'आंग्ला' भिधान भूमि प्रथितयशा, जी निसर्गरति साधी. २
लाजविती क्षेत्रें हीं विस्तृत 'आर्केडिआ'[3] प्रदेशातें;
स्रोतहि सुरम्य येथिल हंसती 'जेलम'[4] नदीप्रवाहातें; ३
वाहति सुमंद येथें वाताच्या मृदु चहूंकडे लहरी;
मंजुल खगकूजनही शाखांशाखांवरून चित्त हरी. ४
सौम्य प्रकट करी निज विलास येथें निसर्ग परिपुष्ट;
अत्याशा परि सलते हृदयीं धनिकांचिया असंतुष्ट. ५
प्रभुता निज सर्व जनांवरि गाजवितो विवेक उग्रपणीं;
मर्यादातिक्रम[5]गुरु धरिती ते हेतु साहसी स्वमनीं. ६

---

१. इंग्लंद हालंदच्या दक्षिणेस आहे. २. सगळ्या यूरोपांतील देशांपेक्षां इंग्लंदांत वसंतऋतु लवकर येतो. ३. हा एक ग्रीसमध्यें डोंगराळ प्रदेश आहे, त्यास सांप्रत ' ओरिसा ' ह्मणतात. ४. पंजाबांतील नदी. ५ जो खरोखर मोठा नाहीं, पण केवळ मर्यादेच्या बाहेर गेल्यामुळें जो मोठा दिसतो, अशा प्रकारचा साहसी हेतु ते मनांत बाळगतात.

आचरणांत जयांच्या अहंपणा, लोचनींहि अवगणना
ऐशा विलोकितों मी मनें नरश्रेष्ठ येथ आंग्लजना. ७
दिसती समीक्ष्यकारी[1], उच्चार्थी सर्वथैव ते व्यग्र,
संस्कारहीन बालें सृष्टीचीं जणुं नवोद्भव समग्र . ८
दिसती ते गंभीर स्थिरधीयोगेंचि थोर तेजस्वी;
निज कल्पिताधिकारा रात्रंदिन जागरूक सर्वस्वी. ९
प्रौढी[2] निरूपिण्याची हक्कांतें राजनीतितत्त्वज्ञ
मानुनि अपणां मिरवी शेतकरीही स्वकीय अल्पज्ञ. १०
मानी स्वतंत्र मनुजासम मानी आपणा सदा साची
तो, स्वाभिमानशून्य स्वीकारी कधिं न वृत्ति दासाची. ११
केवल तुझ्याच योगें स्वतंत्रते ! लाभ हे इथें दिसती.
शोभा ही तव अद्भुत अभिमत ऐशी कुठें नसे जगतीं. १२
धन्यास्पद असते ते लाभ खरे सुहित[3]मिश्रणादुष्ट;
संभवती परि दोषहि येथें तुझिया करेंचि परिपुष्ट. १३
स्वातंत्र्य तेंचि, आतिशय धरिती अभिमान आंग्लजन ज्याचा,
करुनी विलग तदंगें तोडी दृढबंध त्या समाजाचा. १४
स्वैरगति क्षुद्राधिप[4] एकाकीं वेळ घालवी सारी;
अज्ञात हेतु येथें संसृतिसुखकर समाजदृढकारी. १५
अन्योन्यवाद चाले; स्वाभाविक बंध हो श्लथीभूत;
अल्पहि दिसे मतैक्य न; एक जयी हो दुजा पराभत. १६
संक्षोभ येथ माजे; घोष करी पक्षभेद संयमित;
प्रतिरुद्धाकांक्षेच्या लाटा उठती चहूंकडे अमित. १७

---

१ विचारी. २ अज्ञान शेतकरी स्वतांस राजनीतिकुशल मानून आपल्या हक्कासंबंधानें विवेचन करण्याची प्रौढी मिरवितात. ३ जर त्यापासून सुहित झालें असतें तर ते लाभ फार फायदेशीर झाले असते. ४ सरदार लोक इतर लोकांबद्दल बेफिकीर असतात.

आतिचलनें अंतीं तें समाजपृथुयंत्र सर्व पावेल
गतिरोध, वा तदंगक्रांतिज्वलनें समूळ भंगेल. १८
इतुकें न निंद्य हें; परि जशीं जशीं सहजबंधनें सकल
होतीं प्रणष्ट, वा हो धर्मप्रीत्यादरादि लुप्तबल, १९
दृढमूल कायद्याचीं संपत्तीचींहि बंधनें कृतक,
होउनि तशीं तशीं निज जबरें सर्वत्र लादिती वचक. २०
यास्तव आज्ञापरता अंकित त्यांच्याचि मात्र हो सारी;
पावे धी निष्प्रभता, सद्गुण रडती बसूनि अंधारीं. २१
येईल काल पुढती, होइल जैं भूमि नष्टविभवा ही,
विद्वज्जनविपुला जी योधांची होय तत्परा दाई. २२
पुत्रां कुलीन ठेविति जिथें स्वदेशाभिमान–रिक्तार्थ,
नृपती प्रजाहितैषी, झटती जेथें कवीश सुयशार्थ, २३
ती ही बनेल अंतीं लोभाचा अंधकारमय कूप,
मग जातील अनादृत मृत्युमुखीं वीर, पंडितहि भूप. २४
मानूं नका परी हे दावुनि, वांछीं, स्वतंत्रता–दोष,
जनताराजकृपा मी चाटुवचें देउनी तया तोष. २५
आयि सत्यदेवि! करिशी मम उच्चप्रेरणा मनीं गे! तूं,
उच्चाटीं असले मद्हृदयांतुनि सर्व हे असद्धेतू! २६
सुभगे स्वतंत्रते! तुज दोघेही हो समान हानिकर,
रोष क्षुद्रजनांचा जनपीडकनृपतिचा असि प्रखर. २७
क्षणभंगुर पुष्पा वा! द्वयें जया प्राप्त होय कुदशा हे,
गर्वितजनानपेक्षें, आसक्त्यतिरेकभानुकरदाहें. २८

---

१ त्या समाजरूपी यंत्रांतील अनेक भागांच्या घर्षणानें उत्पन्न झालेल्या अग्नीनें. २ अस्वाभाविक. ३ आज्ञाधारकपणा. ( कायदा व संपत्ति यांच्याचमुळें समाजांत आज्ञाधारकता दिसत आहे. ) ४ वंशपरंपरागत मिळकत. ५ पैशाकरितां नव्हे, तर यशाकरितां. ६ आदर मिळाल्यावांचून. ७ गर्विष्ठांच्या उपेक्षेनें व स्वातंत्र्यपुष्पाची अतिशय आसक्ति धरल्यानें स्वातंत्र्याचा नाश होतो.

होवो संतत तव या अस्थायि–प्रकृतिमाजिं सुविकास;
केवळ निरोधितों मी व्युत्क्रमनिर्भय तया करायास. २९
कारण देशीं द्रेशीं अनुभव पटतो असाचि कीं खास.
सद्बुद्धिमंत शासी नियत कलाकष्टजीविवर्गास. ३०
स्वैरपणा वृत्तींतिल किंवा नुरणें मुळींच लवलेश
कसल्याही बंधाचा, स्वातंत्र्याचा असा न उद्देश. ३१
राव असो, रंक असो, सर्वांवरि योग्य ठेवणें भार,
हेतु स्वातंत्र्याचा हाचि खरोखर असे महोदार. ३२
राष्ट्रांत पक्ष होतां नाहीं तर एकलाचि बलवंत
तद्वर्धितजडभारें दुजाहि पावेल निश्चयें अंत. ३३
सामर्थ्यें दृढ होउनि, मिळणें कष्टोपजीविवर्गातें
अनुरूपाधिकसत्ता, कितिकां हीच स्वतंत्रता वाटे. ३४
उन्नतिनें पक्षाच्या उन्नत हो राष्ट्र सर्व एकाच,
परमार्थ मूढतेची सीमा हे होय मानणें साच. ३५
आत्मा प्रशांत राही माझा हा तोंवरी न वा व्यथित
संक्षोभें मन होई, जोंवरि दिसती न संकटें उदित. ३६
पक्षाग्रणी परी जैं विवादरत रोधिती स्वनृपतींतें.
करिती तदीय सत्तासंक्षेपें निज बलाभिवृद्धीतें. ३७
बघतों मी मिळतांचि स्वातंत्र्याचा स्वतांस उपभोग
उद्घोष पक्ष जेव्हां करि कीं हाचि स्वतंत्रतायोग. ३८
शासनाविधि नव करिती न्यायाधिप जइं निजस्पृहाचारी
उपकारक धनिकां, जे होती परि निर्धनास अपकारी. ३९
जैं रानटी विदेशांतुनि आणिलें ज्या लुटूनि वित्तास
निजदीनबांधवां ते योजिति गेहीं करावया दास; ४०

---

१ देशांतील वरचेवर बदलणाऱ्या स्थितींत. २ अतिक्रमापासून सुरक्षित. ३ अतिशय. ४ कायदे. ५ स्वैरवृत्तीचे न्यायाधीश.

होती अनुकंपा, भय रोषहि मन्न्यायबुद्धि तैं सकल
जागृत, शांति मनींची विचले हृदयीं विकार घेति बल. ४१
अंतीं अर्धप्रेरित होउनिया मी स्वदेशभक्तीनें,
मत्प्रियदेशोपस्थित आकुल तैसाचि अर्ध भीतीनें, ४२
घेई धाव नृपाच्या निजाश्रयास्तव पदांकडे सहसा,
ते क्षुद्रलोकपीडकपाश त्यजुनी भयार्त पाडससा. ४३

---

# छेद आठवा.

## इंग्लंडची समाजस्थिति (पुढें चालू.)

विषयः—वर सांगितलेल्या प्रकारामुळें इंग्लंदांत संकटें उत्पन्न झालीं आहेत. श्रीमान लोक गरीबांना देशांतून हाकून देत आहेत व संपत्तीच्या भरतीबरोबर लोकसंख्येस ओहोटी लागली आहे ( क. १ ते १६ ). शेवटीं तात्पर्य एवढेंच कीं, संपूर्ण सुख भोगत असलेला देश शोधून काढणें निरर्थक व कंटाळवाणें काम होय. राष्ट्राची शासनपद्धति कोणत्याही प्रकारची असो त्यांत सुख सांपडावयाचेंच. कारण व्यक्तीच्या सुखासुखामध्यें कायदा व राजा यांच्यामुळें बदल होत नाहीं. ( क. १७ ते २६ ),

धिक्कृत करावया त्या बंधो! हो तूं मला सहाकारी,
लुब्धजनें नृपसत्ता निरोधिली प्रथम घोर ज्या कालीं. १
करुनी असा कलंकित सत्तेचा प्रमुख हा तयें उगम;
संपत्तिलागिं जीवन राष्ट्राचें निवळ केलिये परम. २
नच देखिलें त्यजुनि कृषिकर्मा सर्वत्र आंग्लदेशांत
हो तत्सुपुत्र कांचनखनिकर्मी व्यर्थ रत विदेशांत ? ३

ना देखिली तयांची विजयश्री पारि सुशीघ्र संहार[1]
होत असे अत्युज्ज्वल दीपशिखा त्वरित जेंवि निस्सार ! ४

देखियलें नच किंवा वैभव निज राखण्या जनें सधन
तत्रस्थां घालवुनी केली ग्रामें सभोंतिचीं विजन ? ५

पूर्वी, तसेच, जेथें इथें तिथें दिसत झोंपड्या सान;
विलसे विविक्तविभवें विदयांच्या[2] ते अतां परी स्थान ? ६

अथवा न पाहिलें कां धनिकादेशें स्वकामसंचारी
सुचिरंजनोषित[3] झालीं ग्रामें संमृद्ध धूलिगत सारीं ? ७

वा देखिलें न आपण आज्ञाधन सुत, पिता जरार्त्यसुखी,[4]?
भार्या सुशील गुणिला, कन्या तैशी त्रपाविनम्रमुखी, ८

घालविलें सहसा या सकलांतें तद्गृहांतुनी नष्टें
पश्चिमसिंधु[5] विलंघुनि परदेशीं[6] काल लोटण्यां कष्टें, ९

पृथुकच्छासह जेथें 'ओस्वेगो[7]' वनमहाधुनी मिरवे,
बसवी 'नार्थगरा[8]' ही कानटळी स्वप्रपातघोररवें ? १०

जटिलवनें नानाविधवृक्षलता गुल्मवाटिकीं दाट
दिसती, फार भयावह वाटे त्यांतून काढण्या वाट, ११

हिंस्र पशु व्याघ्रादिक करिती निःशंक जेथ संचार,
ताम्रहि[9] नरमांसाशी शरसंधानें करी वधाचार, १२

भीषण झंझावातहि करी जिथें चंड घोषणा वरती,
क्रव्यादनरपशूंच्या घोररवें दशदिशा जिथें भरती, १३

---

१ चोहोंकडे जय परंतु त्याबरोबर भराभर मनुष्यहानिही होत आहे. २ अधर्मांच्या. ३ ज्यामध्यें पुष्कळ काळ लोकांचें वास्तव्य होतें अशीं ( गांवें ). ४ म्हातारपणच्या पीडेनें दुःखी. ५ अतलांतिक महासागर. ६ आस्ट्रेलियांत. ७ न्यूयार्क प्रांतांतील नदी. ८ हा धबधबा कानडा व संयुक्त संस्थानें यांच्या सरहद्दीवर आहे. ९ तांबड्या वर्णाचे.

दारुण वनप्रदेशीं ऐशा धरि भीति जेथ एकान्त,
अद्यापि जर बहिष्कृत दुर्दैवी भटकला कुणी पांथ; १४
चिंताविमूढमानस होउनि भुग्नास्य तेथ सायास,
ना थांबवे भयें त्या, अक्षम परि तेथुनी हलायास, १५
सविषाद तें करी निज वैवभपरिपूर्ण आंग्लदेशातें
दृष्टिक्षेप विचारीं त्या होई लीन येति जे मातें. १६
खेदकरी ठरली ही निष्फल सुखशोधन स्पृहा माझी;
नच बहिरुपाधिसंश्रित, सुख केवल सांपडे मनामाजीं. १७
कां भटकलों वृथा मी शांतिसुखाराम गेह सोडोनी
शोधाया सुख तें, जें देई प्रत्येक देश हटकोनी ? १८
होओ प्ररूढ राज्यीं शासनविधि सुष्ट दुष्ट कसलाही,
अवलंबूनि तथापि व्यक्तिसुखासुख न त्यावरी राही. १९
दारुणता जरि अपुला प्रतिराज्यीं माजवी धुमाकूळ
जरि वा कुशासनें, नृप पीडक करिती प्रजेसि आकूळ, २०
किति अत्यल्प तरी तीं परिणामक मनुज हृत्पटावरती
सुखदुःखें होतीं, जीं देती, वा नृपति शासनें हरती ! २१
गाजवितो निज कर्मीं मानव अधिकार सर्वदा पुरता,
उत्पादितो म्हणोनी स्वसुखें वा शोधितो स्वयें भंवतां. २२
संसारसौख्यसिंधुप्रवाह वाहे अहर्निशीं संथ
न क्षुब्ध होइ वातें प्रत्यूहें वा ढळे तिचा पंथ. २३

---

१ हद्दपार केलेला. २ डोकें नमवून. ३ कष्टी. ४ जे विचार माझ्या मनांत उद्भवत आहेत त्याच विचारांत तो मग्न होतो. ५ मनाचे स्थितीवर अवलंबून असते. ६ जुलमी कायदे. ७ राजा व कायदे हीं जीं सुखदुःखें देतात किंवा नाहीं-शीं करतात त्यांचा परिणाम मनुष्यांवर फारच अल्प होतो. ८ मनुष्यप्राणी आपल्या कृत्यांबद्दल जबाबदार आहे, म्हणून तो अर्थातच आपलें सुख उत्पन्न करतो, किंवा तें शोधूनही काढतो. ९ नदी.

तीक्ष्णायसशय्या जीवरि भूपें ' डामिनास[1] ' निजवीलें;
तैसे किरीट तप्तायसकृत जे ' ल्यूक[2] ' शीर्षि चढवीलें. २४
तीव्ररुजाकरचक्रें; सुसज्जशस्त्रादि सर्व हे चंड
आकांक्षार्थ[3] मदान्धा केवल निर्माण जाहले दंड[4]. २५
परि त्या शांतजनांहीं, ज्या हें स्वप्नीं न किंचिदपि ठावे,
मोदें विवेक–धर्म–श्रद्धादिक–गुण खुशाल भोगावे! २६
जनसत्तावादीतें गोल्डस्मिथकविवरकृत ' प्रवासी' तें
नारायणें मराठी रूप दिलें आङ्गलकाव्य–सुकृतीतें. २७

---

# छेद नववा.

## उपसंहार.

विषयः—या भाषांतराच्या वाचनानें कोण्या सत्कवीला प्राच्य समाजाचें निरीक्षण करण्याची स्फूर्ति होवो असें कवि इच्छित आहे ( क. १ ). सौंदर्यखनि हिंदभूच्या मध्यवर्ती विंध्याद्रीवर बसल्यानें येथील बंगाला वगैरे अनेक देश दिसतील ( क. २ ते १९ ). या सगळ्या देशांमध्यें जरी एकच राज्यघटना आहे, तरी सुद्धां त्यांत पुष्कळ बोधकारक भेद दृष्टीस पडतील. मानवी स्वभावास हेतुभूत असणाऱ्या निगूढ शक्ति, नैसर्गिक साधनें व सामाजिक बंधनें कोठें कोठें आहेत व मूळ कवीचा सुखदुःखाचा सिद्धांत कितपत खरा आहे याच्या अवलोकनानें मनास आनंद वाटेल. असल्या प्रकारचें तत्त्वनिरूपण करण्याचें जेव्हां

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ग्रं. क्र.

---

१ ' डामिन ' या फ्रेंच मनुष्यानें आपला राजा पंधरावा लुई यास भोसकून मारण्याचा प्रयत्न केला, परंतु तो फसल्यामुळें त्यास लोखंडाच्या शय्येवर निजविणें वगैरे अघोरी शिक्षा भोगाव्या लागल्या. २ ' ल्यूक ' यानें आपल्या देशांत बंड केल्यामुळें त्याच्या डोक्यावर तापलेल्या लोखंडाचा मुकुट ठेवण्याची शिक्षा झाली. ३ महत्वाकांक्षी लोकांसाठीं. ४ शिक्षा.

कोणी अंगावर घेईल, तेव्हांच माझे श्रम सफल होतील असें शेवटीं कवीनें सांगितलें आहे ( क. २० ते ३५ ).

काव्य 'समाजनिरीक्षण' पाश्चात्य स्फूर्तिदायि सत्कवितें
भारतिच्या हें होओ प्राच्यसमाजेक्षणार्थ; गे कविते ! १
नानाविध सौंदर्यें प्रथितयशा या महीतलावरती
'हिंदीभू' नामा जीवरि दावी सृष्टि निज विशेष रति. २
नाना समाज, नाना रीती, धर्महि अनेक पंथ तसे,
भाषावेषविविधता इतुकी कोठें दुजी न नांदतसे. ३
क्रव्यादें कृतभीषणपरिसर घनगर्जितें कुहरभाजें
भारतजलधीमाजीं[1] विशाल जो मंथदंडसा साजे. ४
' विंध्याद्री ' वरुनि अशा निज दृष्टि क्षेपतां, बहूपरिचीं
दिसतिल विचित्र रूपें कविसी येथिल निसर्गरमणीचीं ५
प्राच्य दिशेतें वळतां ज्यावरि रुळते महा नदीमाला
ऐश्वर्याचें धाम प्रतिभाशाली सुविद्य 'बंगाला'; ६
तेथुनि सुपीक जात्या बसला जो सुरसरित्तटाकीस
परि रुधिरप्रिय कटवा 'रोहिलखंड' हि पडेल दृष्टीस; ७
नानकपंथी भू यन्नामोच्चारें सदैव कांपेल,
ऐसा स्वधर्मवेडा उदिचीं 'पंजाब' देश शोभेल; ८
धारातीर्थ जयांची क्रीडनभूमि प्रसिद्ध 'रजपूत',
नोहे साहस साक्षात् वसे, असा देश पश्चिमीं पूत, ९
विलसेल देश मग तो निर्जल परि वैश्यवृत्ति ' गुजराथ ',
काढी प्रखरपणा निज संपत्सौख्यें भरूनि दिनरात; १०
वदते ज्यास वनश्री प्रीतीचें हेंचि माझिया धाम
दक्षिण दिक् प्रांतातें नाम ' महाराष्ट्र ' वीर्यविश्राम ! ११
वळतांचि, स्थित होई शतकद्वय लोचनापुढें ख्यात,
राष्ट्रखनींतुनि जेव्हां भटहीरक चमकले असंख्यात १२

---

१ भारतदेशरूपी समुद्रांत.

शतकें दोनाचि परि तैं तयें स्वदेशस्वधर्मसर्वस्वें[1]
निजनाम साच सार्थक केलें अतुलप्रताप वर्चस्वें. १३
स्मृतिगत परि सारें जैं परिवर्तन होय कालचक्राचें,
पूर्वजगुणगणगानीं केवल हा देश संप्रती नाचे. १४
व्यवसायान्तरदर्शित विराग कालानुवर्तिताभावें
कर्तव्यमूढ होउनि हताश मृगसा इतस्ततां धावे. १५
परि एकदां तयाच्या पटतां सम्यक् सशंक बुद्धीस,
तें वज्रलेप होई सोडीना निज कधीं चिकाटीस. १६
अगीं दोष तुझ्या हे असोत कितिही, तरी तुझ्यावरती
निरतिशया महेशा ! पुत्राची या असो तुझ्याच रति. १७
राहोचि हा कसाही, देशा निज सोडुनी अशा सुभग
कधें पूर्वदिशेतें अंतीं वळतांचि हा मनाविहग, १८
शस्त्रास्त्रव्यापारानभिज्ञ परि शास्त्रविद् दिसे 'मद्र'
विस्तृतपूर्वांबुनिधिप्रक्षालितपाद देश तो भद्र. १९
दिसतिल बहुविध ऐशीं अंगें एकाचि राजतंत्रानें
बद्ध जरी राष्ट्राचीं, होय जसा मणिसमूह सूत्रानें. २०
होतें विविध फुलांहीं जेंवी सौंदर्यपूर्ण उद्यान,
हा देश तेवि अंगें एकत्वाचा जरी वरी मान; २१
जाज्वल्यता दिली निज रजपूतें या विशाल देशातें,
मानापमान याचा पाठ दिला मोगलें तया हातें, २२
गिळुनि द्वेष सुदीर्घ, स्नेहें कवळी परस्परां जनता
जीनें, आंग्लजनें ती दिधली राष्ट्रैकचित्तगुणपरता. २३
सोशिकपण, कंटकपण अर्पियले या गुणां मराठ्यांहीं,
भूषविलें पारासिकें साहस, कालानुवर्तिता यांहीं. २४
सुब्राह्मणें तयाला दिधली निज सूक्ष्म तैल बुद्धिमता,
ऐशा अंगांगांनीं आली राष्ट्रैक्यतेस हटबलता. २५

---

१ स्वदेश व स्वधर्म हेंच ज्याचें सर्वस्व होतें.

स्वाभाविक सामाजिक बौद्धिक धार्मिक अनेक भेद तरी
वसती इथें. निरीक्षण सुखद जयाचे मनास बोध करी. २६
बुद्धिप्रधान दिसतो एक दुजा भाग भावनायुक्त;
कां भिन्नता असे ही येथ ? तयाची विचारणा युक्त. २७
ज्या गूढशक्तिसंहतियोगें मनुजस्वभाव घटताहे;
त्या कोठें किति दिसती येथें आल्हाद होय बघतां हें. २८
कोण्या स्थलीं निसर्गें केलीं सुखसाधनेंहि अनुकूळ
करितो समाज कोठें निजपुत्रां बंधनीं समाकूळ. २९
धरुनी उदारता बहु ईप्सित वितरी सुखें कुठें शर्म;
उग्र स्वरूप दावी भीषणकर्मा श्रमें कुठें धर्म. ३०
असती इथें तिथें, तीं अंगें जुळवोनि राजपृथुयंत्र
चालायास सुयंत्रित अमोघ हो कोणतें महातंत्र ? ३१
दुःखैक व्याकुलता नांदे वा येथ सौख्य एकांत,
दिसतो सुखासुखाचा किंवा कविचा खराचि सिद्धान्त. ३२
स्थित्यंतरें इथें जीं कोलाहल उग्र जाहलीं करतीं;
परिणामक किति झालीं जनतेच्या तीं सुखासुखावरतीं ? ३३
ऐशा अनेक तात्त्विक माळ गुणीं गुंफिली विचारांची;
भूषा तीच मराठीकाव्यवधूलागिं कां न व्हायाची ! ३४
कुणि हें तत्त्वनिरूपण होइल उद्युक्त जैं करायास;
तेव्हांचि साच मानिन झालें कीं सफल हे मदायास. ३५

समाप्त.

9330

१ व्याकूळ, दुःखित. २ देई ( याचा 'धर्म' हा कर्ता ). ३ सुख. ४ गोल्डस्मिथ कवीचा. ५ हा दुष्ट समास अपरिहार्य आहे.

REFBK-0001330

REFBK-0001330